Lend A Hand India

# कृतीशील संवाद

शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ वर्ष ८ वे अंक २: जुलै २०२१

**नमस्कार,**

या शैक्षणिक वर्षातील 'कृतीशील संवाद' मासिकाचा दुसरा अंक आपल्यासमोर घेऊन येताना आम्हला आनंद होतो आहे. कोविड सारख्या आजाराचा प्रादुर्भाव अजूनही कमी झालेला नसून आपण सर्वांनी आपली व इतरांची काळजी घेणे तसेच आरोग्य विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. पहिला अंक वाचून आपल्यातील अनेकांनी दिलेल्या प्रतिक्रियांसाठी मनापासून धन्यवाद.

मागील महिन्यात १५ तारखेपासून ऑनलाईन शाळांना सुरुवात झाली. सर्व शाळांनी अगदी नियोजन पूर्वक तसेच शासकीय सुचनांचा आधार घेऊन आपल्या सत्रांना सुरुवात देखील केलेली आहे. शाळेचे वार्षिक वेळापत्रक तयार करण्यापासून ऑनलाईन अभ्यासक्रम पुर्ण करेपर्यंतचे नियोजन शाळांनी केलेले दिसून येते. विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून अभ्यासक्रम शिकवण्याबरोबरच त्यांची अभ्यासातील रुची टिकवणे, ऑनलाईन शिकवण्याच्या नवनवीन पद्धती शिकणे, नवे तंत्रज्ञान आत्मसात करणे हे देखील महत्त्वाचे ठरते आहे. याला अनुसरूनच मागील महिन्यात संस्थेकडून निदेशकांसाठी 'ऑनलाईन अध्यापनाची विविध तंत्रे' हे निदेशकांसाठी ऑनलाईन प्रशिक्षण घेण्यात आले. बहुतांश निदेशकांनी या प्रशिक्षणाचा उपयोग करून अध्यापन सुरु देखील केले आहे. या अंकात प्रशिक्षणाबद्दल सविस्तर आलेले आहेच.

पुढील काळात कोविड आजाराची परिस्थिती लक्षात घेऊन विविध बदल होत राहतील. आपल्या परीने आणि योग्य पद्धतीने एकत्रितपणे आपण या संकटाला नक्कीच सामोरे जाऊ शकतो. सर्वांनी योग्य ती खबरदारी आणि काळजी घेतल्यास आपण नक्कीच पुर्वीसारख नियमित आयुष्य सुरु करु शकु.

पुन्हा भेटूया पुढील महिन्यात,

धन्यवाद.



सुनंदा माने
कार्यकारी संचालक,
लेंड अ हँड इंडिया.

## या अंकात वाचा ...


- **विशेष लेख:** 'मल्टी स्कील' विषयावर श्री. शांतादुर्गा शाळेचा माहितीपुर्ण ब्लॉग
- **MSFC शाळावृत्त**
  शैक्षणिक वर्ष २०२१/२२ मल्टी स्कील अध्यापनास सुरुवात
  ऑनलाईन तंत्रज्ञान वापर : निदेशक प्रशिक्षण
- **निदेशक विशेष लेख**
- 'कारीगर' - कौशल्य प्रशिक्षण केंद्र: भाग दोन
- आगामी वार्ता
- लेंड अ हँड इंडिया अपडेट्स
- प्रोजेक्ट कॅटॅलिस्ट

# विशेष लेख

## 'मल्टी स्कील' विषयी माहितीपुर्ण ब्लॉग ! देवी शांतादुर्गा शाळेचा अभिनव उपक्रम




**श्री.** देवी शांतादुर्गा हायस्कूल, वडाचापाट या प्रशालेमध्ये २००६ पासून मल्टी स्कील विषय शिकविला जातो. त्यावेळी ग्रामीण भाग आणि पालकांची परिस्थिती पाहता मल्टी स्कील विषयाकरिता विद्यार्थ्यांकडून फी आकाराने शक्य नव्हते. अशात मल्टी स्कील विषय शासनाच्या अटी-शर्थी नुसार राबविण्यासाठी चार वर्ग खोल्या व इतर साधन सामग्री आवश्यक होती. या सर्व गोष्टींची पूर्तता करण्याकरिता लेंड अ हॅन्ड इंडिया कडून हा उपक्रम राबवण्यासाठी मार्गदर्शन आणि अर्थसहाय्य मिळाले. पुढे या मल्टी स्कील उपक्रमामुळे कृतीशील कौशल्यशिक्षण हे या शाळेचे वेगळेपण ठरले. या शाळेत चाललेले विविध कृतीशील उपक्रमांमुळे विद्यार्थी हाताने काम करत करत शिकत आहेत. टाकाऊ वस्तूपासून समाजोपयोगी वस्तू बनवत आहेत. अनेक विद्यार्थी उत्तम तांत्रिक शिक्षण घेऊन स्वत:चा छोटा व्यवसाय सुरु केला आहे. कौशल्य अभ्यासक्रमामुळे परिसरात शाळेला नवी ओळख मिळाली. विवध शाळा, विद्यार्थी, सुजाण नागरिक शाळेला भेट देऊ लागले.

शाळेमध्ये राबविण्यात येणारा हा अभ्यासक्रम आणि त्याचा शाळेला आणि विद्यार्थ्यांना झालेला फायदा, मदत हे सगळ इतर शाळांना देखील माहिती व्हावं तसेच शाळेमध्ये सुरु असलेले विविध उपक्रम, समाजोपयोगी काम, शेती, सुसज्ज कार्यशाळा हे सर्वांपर्यंत पोहचावं या हेतूने तंत्रज्ञानाच्या मदतीने शाळेने स्वत:च्या शाळेचा ब्लॉग बनवला. ब्लॉग म्हणजे काय तर एक असे ऑनलाईन व्यासपीठ(Platform) जिथे आपण आपल्या शब्दात आणि छायाचित्रांच्या सहाय्याने आपल्याकडील योग्य माहिती सर्वांपर्यंत पोहचवू शकतो.

याचा उपयोग शाळेला योग्य ती ओळख मिळवण्यासाठी झाला. याशिवाय विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाला, मेहनतीला यातून योग्य दाद मिळाली. तसेच देशातील अथवा परदेशातील माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, संस्थेचे हितचिंतक आणि अर्थसहाय्य करणाऱ्या व्यक्तींपर्यंत पोहचण्यासाठी ब्लॉग ची संकल्पना उत्तम प्रकारे कार्य करू लागली.

भंडारी एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यानी ब्लॉग च्या माध्यमातून शाळेमध्ये सुरु असलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती उपलब्ध करून दिली. ब्लॉग स्पॉटवर उपलब्ध केलेल्या माहितीचा वापर करून देश विदेशातील विविध स्तरातील मान्यवर, आजी-माजी विद्यार्थी, पालक वर्ग, विविध शाळा, संस्थाचालक, शासकीय अधिकारी, हितचिंतक यांच्यासोबत संपर्क केला. त्यांना शाळा पाहण्यासाठी आमंत्रित केले. याद्वारे अनेकांनी शाळेलाा भेट दिली. शाळेचे व शिक्षक वर्गाचे कौतुक केले. तसेच महत्त्वाचे म्हणजे संस्थेला आर्थिक मदत मिळण्यास मदत झाली. काही वर्षातच श्री. देवी शांतादुर्गा हायस्कूल, वडाचापाट हे आय. बी. टी./ मल्टी स्कील विषयाचे परिपूर्ण असे मॉडेल स्कूल म्हणून नावारूपाला आले.

आजही शाळेमध्ये अनेक प्रकल्प राबविले जात आहेत. उदा. बांबू लागवड, नर्सरी शेड, गांडूळ खत प्रकल्प, विविध पालेभाज्या, मधुमक्षिका पालन, आदी. या उपक्रमामुळे शाळेत विद्यार्थांचे अधिकचे प्रवेश होऊन शाळेच्या पटसंख्या वाढीसाठी ब्लॉगचा खूप प्रभावी उपयोग होत आहे. अशा प्रकारे या ब्लॉग च्या वापरामुळे मल्टी स्कील उपक्रम आणि शाळा त्याचा प्रचार आणि प्रसार होऊन विकासाच्या दृष्टिकोनातून शाळा सक्षम होण्यास मदत झाली आहे .

ब्लॉग ची लिंक -

http://ibtvadachapat1.blogspot.com/p/blog-page_66.html



## शैक्षणिक वर्ष २०२१/२२ मल्टी स्कील अध्यापनास सुरुवात

**कोविड** आजाराची सतत बदलणारी आकडेवारी, विविध शासकीय परिपत्रके, सतत बदलणारे नियम, या सगळ्या धामधुमीत सर्व शाळांनी नव्या जोमाने आणि उत्साहाने १५जून पासून नियोजनबद्ध पद्धतीने मल्टी स्कील अध्यापनास सुरवात केली आहे. प्रत्यक्ष शाळेत येऊन वर्ग सुरू करण्यास अनुमती नसल्याने सध्या ऑनलाईन पद्धतीने वर्ष २०२१/२२ ची सुरुवात झाली आहे. तासिका सुरू करण्यापूर्वी सर्व शाळांनी पूर्वतयारी करत यामधे वार्षिक नियोजन, तासिकांचे वेळापत्रक तयार करणे, नवीन विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे, विद्यार्थ्यांच्या तुकड्या निश्चित करणे, इयत्ता निहाय विद्यार्थ्यांचे व्हॉटस अप चे समूह(Group) तयार करणे, मल्टी स्कील कार्यशाळेतील साहित्याची मोजणी करून त्याच्या नोंदी करणे, कार्यशाळा सुसज्ज करणे इत्यादी कामे सुरु केली आहे. ऑनलाईन तासांना विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढत असून वाढून त्यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळतो आहे. कौशल्य अभ्यासक्रमांतर्गत नवनवीन प्रयोग करणे, नवनविन गोष्टी शिकणे याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात कुतूहल दिसून येत आहे.

याबबत काही विद्यार्थ्यांसोबत संवाद केला असता अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या शब्दात प्रतिक्रया दिल्या आहेत.




**शाळा** परत सुरू झाली आहे आणि यामुळे मी खूप खूष व आनंदी आहे.आता आम्हाला कौशल्य शिक्षण अभ्याक्रमात नवनवीन प्रयोग करायला मिळणार आहेत. घरात बसून आम्ही वेगवेगळे प्रयोग करायला शिकलो आहे आणि हे कृतीयुक्त प्रयोग करायला मला खूप आवडतात. माझ्या कुटुंबातील सर्वांना हे कृतीशील कौशल्य शिक्षण खूप आवडते.

**रीद्धी मेस्त्री, इयत्ता - १० वी खेरनगर म.न.पा.शाळा मुंबई.**

**आपल्या** सर्वांना माहीतच आहे की करोनाचे संकट आज आपल्या सर्वांवरच आलेले आहे. आमचे शिक्षण चालू ठेवण्याचा सध्याचा एक मार्ग म्हणजे ऑनलाईन शिक्षण पद्धती. यामुळे आम्हाला शिक्षणाच्या प्रवाहात राहण्यास मदत झाली. या वर्षी कोणकोणते प्रात्यक्षिक आम्हला आमचे शिक्षक शिकवणार आहेत याचे मनात कुतूहल आहे. इतर विषयापेक्षा हा विषय मला मनापासून खूप आवडतो. आमचे शिक्षक या विषयाचे अध्यापन आम्हला खूप चांगल्या प्रकारे करतात. अध्यापन करत असताना ते अधून मधून मला प्रश्न विचारतात त्या प्रश्नांची उत्तरे द्यायला मला खूप आवडते.

**आदिती दत्तात्रय गावडे, इयत्ता - १० वी हिरकणी विद्यालय गावडेवाडी.**


**मल्टी स्कील** विषयाचे आमच्या तासिका १५ जून पासून सुरू झाल्या आहेत. इयत्ता १० वी चे महत्वाचे वर्ष लक्षात घेता आमचे शिक्षक आम्हला खूप चांगल्या प्रकारे शिकवत आहेत.अध्यापन करीत असताना ते आम्हाला रोजच्या व्यवहारातील उदाहरणे देत असतात त्यामुळे हा विषय अगदी जिवंत वाटतो. प्रत्येक प्रत्यक्षिक करताना एक वेगळा अनुभव अनुभवयास मिळतो. ऑनलाईन पद्धतीने शिक्षण जरी सुरू असले आणि एखादा विषय समजला नाही तर आमचे शिक्षक योग्य ती खबरदारी घेऊन आमच्या घरी येऊन आम्हला मार्गदर्शन करतात.

**करण कैलास पवार, इयत्ता - १० वी भारतमाता विद्यालय मायणी.**

## ऑनलाईन तंत्रज्ञान वापर : निदेशक प्रशिक्षण संपन्न

**निदेशकांच्या** मागणीनुसार आणि गरजेनुसार दरवर्षी लेंड अ हॅंड इंडिया प्रशिक्षण घेत असते. मागील वर्षी ऑनलाईन पद्धतीने कौशल्य शिक्षण कसे घेता येईल यावर सर्व निदेशाकांचे एक प्रशिक्षण घेण्यात आले होते.

शालेय वर्ष २०२१-२२ पर्यंतही कोविड संकट आटोक्यात आलेले नाही व तीच परीस्थित सुरु असल्यामुळे दिनांक ७ ते १६ जून २०२१ या कालावधीत लेंड अ हॅंड इंडिया तर्फे ऑनलाईन तंत्रज्ञानाचा वापर करून कौशल्य शिक्षण कसे देता येईल या विषयी प्रशिक्षण घेण्यात आले. स्वाधीन सातारा, कच्छ, मुंबई, मध्य प्रदेश, व प्लॅन १०० अशा विविध प्रकल्पातील एकूण २१७ निदेशकांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. पाच बॅचेसमध्ये झालेल्या दहा दिवसीय प्रशिक्षणामध्ये विविध सत्रे घेण्यात आली. अंजली पांडे, वर्षा सौचे, स्नेहल उतेकर या लाहीच्या टीमने प्रशिक्षण घेतले व प्रकल्प सहाय्यक पल्लवी कोष्टी यांनी प्रशिक्षणाचे नियोजन केले. लाही निदेशक केशव सूळ, अलका गजभिये, हेमा म्हस्के यांनी स्वअनुभवा मधून निदेशाकांचे शंका निरसन केले. **काही निदेशकांचे अभिप्राय पुढील प्रमाणे:**




प्रशिक्षणात शिकवलेल्या विविध App चा उपयोग पाठाचे सुयोग्य नियोजन करताना होईल. तसेच प्रशिक्षणदरम्यान घेण्यात आलेली आईस ब्रेकिंग सारखी Activity आवडली.

**दीप्ती पाधारीया, अहिर कन्या विद्यालय, भुजोडी, कच्छ.**

या प्रशिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करून नियोजन, प्रत्यक्ष शिक्षण आणि मुल्यांकन कसे करावे हे उपयूक्त शिक्षण मिळाले. मला हे प्रशिक्षण आगामी काळासाठी,ऑनलाईन शिक्षण पद्धती चांगल्या पद्धतीने अमलात आणता येतील. प्रशिक्षणा दरम्यान आईस ब्रेकिंग, सकाळची प्रार्थना, ब्रेन गेम, निदेशकांशी विविध मार्गांनी सुसंवाद, सकारात्मक कार्याचे कौतुक, आणि होमवर्क या विविध उपक्रमांमुळे प्रशिक्षण खऱ्या अर्थाने संस्मरणीय झाले.

**विलास राठोड – नवकृष्ण व्हॅली, कुपवाड, सांगली**

"हे असे प्रशिक्षण शैक्षणीक मुल्ये जतन करून भविष्य काळासाठी मार्गदर्शक फायदेशीर असे होते. ऑनलाईन शिकवण्याच्या पद्धतीला अधिक प्रभावी बनविण्यासाठी गुगल शीट, फॉर्म इत्यादी डिजिटल साधनांचे उपयोग आणि त्याचा वापर यावर माहिती देण्यात आली. याशिवाय ऑनलाइन विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्याचे विविध पद्धती प्रशिक्षणात शिकविल्या पद्धती महत्त्वाच्या होत्या जसे झूम, गुगल मीट किंवा कॉन्फरन्स कॉल.

**सारिका विश्वकर्मा, घाटले B.M.C स्कुल, मुंबई.**

# निदेशक विशेष

**नवीन** शैक्षणिक वर्षाची सुरुवात करत असताना मागील वर्षातील आपल्या निदेशक आणि विद्यार्थ्यांनी पार पाडलेल्या काही कामगिरी कडे थोडक्यात पाहू या.

मागील वर्षाची सुरुवात फारच अनिश्चिततेमध्ये झाली. ज्यांनी या आधी कधीच तांत्रिक उपकरणांचा वापर करून शिक्षण घेतले नाही अशा शिक्षक तसेच विद्यार्थी त्यांच्यासाठी ऑनलाईन शिक्षणाशी जुळवून घेण्याचे खूप मोठे आणि नवे आव्हान समोर ठाकलेले होते.

अवतीभवती इतकी आव्हाने असताना देखील सर्व निदेशक तसेच विद्यार्थांनी अशी काही उदाहरणे समोर आणली ज्यातून अनिश्चितता ही फक्त आपल्या विचारांवर अवलंबून असते.

पुणे महानगरपालिकेच्या शाळेत कार्यरत असलेले आमचे निदेशक कुणाल गर्गे ह्यांच्या मार्गदर्शनानुसार, त्यांच्या वर्गात शिकणाऱ्या मुलींनी अगदी हेच करून दाखवले आहे. एक विद्यार्थिनी, सेजल इंगळे ही केक बनवून, ते विकून एक उद्योजक बनली आहे तर मल्टी स्कील फौंडेशन कोर्स ची दुसरी विद्यार्थिनी नेहा काळभोर हिने इंटर्नशिप एट होम (internship@home) उपक्रमात उत्तम कामगिरी करत 'एम्पावर लीडरशिप लैब २०२१' यासाठी निवडली गेली आहे.



या विद्यार्थिनींनी हे यश प्राप्त झाले ते म्हणजे त्यांना लाभलेले शिक्षक कुणाल गर्गे आणि त्यांच्याकडून मिळालेले मार्गदर्शन. कुणाल गर्गे यांच्या बाबत थोडक्यात सांगायचे म्हटले तर स्त्री पुरुष समानता मूल्याची जोपासना करणे. मुलींच्या शिक्षणाकरिता पुढाकार घेऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करून त्यांना आत्मनिर्भर करण्याच्या विचाराने प्रभावित असलेले कुणाल गर्गे हे लाही संस्थेमध्ये गेल्या तीन वर्षांपासून अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान या विषयाचे प्रशिक्षक म्हणून काम पहात आहेत त्याच बरोबर ते मास्टर ट्रेनर असून अनेक राज्यांमधील प्रशिक्षकांना या विषयाचे प्रशिक्षण देखील देत आहेत. त्याचप्रमाणे अन्न तंत्रज्ञान विषयाचा अभियंता असून या पूर्वी त्यांचाकडे या विषयात काम करण्याचा औद्योगिक अनुभव देखील आहे. लाही संस्था प्रत्यक्ष काम करत असलेल्या पुण्यातील कै. बाबुराव सणस कन्या प्रशाला या महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कुणाल अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान हा व्यावसायिक कौशल्य शिक्षणाचा विषय गेले ३ वर्ष शिकवत आहे त्याच बरोबर कौशल्य शिक्षणाअंतर्गत इंटर्नशिप देखील विद्यार्थ्यांकडून ते करवून घेत आहे. लाही संस्थेचा च्या 'कारीगर' ट्रेनिंग सेंटर मध्ये अन्न प्रक्रिया विभाग उभारण्याची व तेथील दैनंदिन कामकाज सांभाळण्याची जबाबदारी कुणाल यांनी यशस्वीरित्या पार पाडत आहेत.

कुणाल नवीन व आव्हानात्मक काम करायला लगेच तयार असतात व त्या करीता ते पूर्व नियोजन उत्कृष्ठ पद्धतीने करतात हा त्यांचा विशेष गुण आहे. तसेच कुणाल यांनी टीम मध्ये काम करत असताना अनेकदा पुढाकार घेऊन सहकाऱ्यांचे कुशल नेतृत्व करून काम पूर्णत्वास नेले आहे,. असताना प्रत्येक



# निदेशक विशेष, पान पाच वरून पुढे

Lend A Hand India

आध्यापन करत असताना प्रत्येक सत्र कुणाल पूर्व आणि सूक्ष्म अभ्यास करून, सत्रा मध्ये आधुनिक तंत्रज्ञान वापरून विद्यार्थ्यांना आपल्या विषयाबरोबर इतर संबंधित ज्ञान कसे देण्यात येईल यासाठी प्रयत्न करतात. तसेच सत्र घेत असताना शिकवण्यात येणारा मुद्दा किंवा संकल्पनेला वास्तविक व्यवहाराशी देऊन विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने व्यावसायिक जगताला सामोरं जाण्यासाठी तयार करतात.

प्रत्येक विद्यार्थ्याला समान वागणूक देण्यात यावी या विचारांचे कुणाल असून, प्रत्येक विद्यार्थ्याला समजून घेऊन आणि त्याच्या पातळीवर जाऊन त्याला घडवण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतात. शालेय अध्यापना बरोबर, कुणाल स्वतः विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांना भेटून त्यांना सुद्धा आपल्या पाल्याच्या शैक्षणिक जीवनात जास्तीत जास्त सहभागी होण्याकरता परावृत्त करतात.

सगळीकडे 'कोरोना' चा प्रादुर्भाव असल्यामुळे विद्यार्थ्यांना बाहेर जाऊन इंटर्नशिप करता येऊ शकली नाही. अशा अवघड परिस्थितीत सुद्धा कुणाल ने विद्यार्थ्यांना घरी राहून इंटर्नशिप करण्याचा अनुभव दिला. या इंटर्नशिप अंतर्गत कुणालने अनेक उपक्रम राबविले ज्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घरी राहूनच अनेक व्यावसायिक गुण आणि कौशल्य विकसित करता आल. या मध्ये विशेष करून नुरुन्निसा या विद्यार्थिनीने तिच्या शेजारी राहणाऱ्या ताईकडे घरी अनेक पदार्थ (केक बिस्कीट, पेस्ट्री, पिझ्झा) बनवून विकले. हे सगळं करत असताना नुरुनिस्साने बाहेर न पडता सगळे सुरक्षेचे नियम पाळून घरी राहूनच इंटर्नशिप पूर्ण केली. ती पूर्ण केल्यावर नुरुन्निसा चे संवाद कौशल्य वाढले त्याचबरोबर तिच्यातील कृतीशिलतेला चालना मिळाली व ती वेळेचे नियोजन चांगल्या प्रकारे करायला शिकली. या पूर्ण प्रक्रियेत कुणाल यांनी तिला नियमित मार्गदर्शन केले.

मल्टी स्कील फौंडेशन कोर्स मध्ये आपण नेहमीच उद्योजकता आणि आत्मनिर्भरता या दोन्ही गोष्टींचे समर्थन करत असतो. हा कोर्स शिकत असलेले सर्व विद्यार्थी अत्यंत अभिमानाने ह्या गोष्टीची पुष्टी वेळोवेळी करत असतात. हे विद्यार्थी इतकी उत्तम कामगिरी आणि अथक मेहनत करून यश संपादन करू शकतात ते शिक्षकांच्या, निदेशकांच्या मार्गदर्शनामुळेच. अशा सर्व निदेशकांचे ध्येय हे विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊन त्यांना प्रभावित करून त्यांना आत्मनिर्भर करणे हेचआहे.

विद्यार्थ्यांची, निदेशकांची यशस्वी कामगिरी दाखवणारी ही सर्व माहिती २०२०-२१ च्या 'निदेशक प्रगती अहवाल' मध्ये दिलेल्या माहिती वरून घेतलेली आहे. या सारखेच अजून खूप प्रसंग, अनुभव, अडथळे, त्यावर केलेली मात, स्वाध्याय अशा अनेक गोष्टीची चांगली कामगिरी निदेशकांनी केली आहे. त्यामधे पुणे कार्य क्षेत्रातून कुणाल गर्गे हे एक आहेत. या प्रयत्नांना प्रोहत्सान स्वरूपात लाही संस्थेच्या वतीने सन्मानपत्र देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

पुढील लेखात आपण इतर निदेशक आणि त्याचं कामं याबबत माहिती घेवूया. वर उल्लेख करण्यात आलेल्या नुरुन्निसा शेख या विद्यार्थिनीचे इंटर्नशिप बद्दलचे अनुभव पाहण्या व ऐकण्यासाठी खालील लिंक चा उपयोग करा

https://drive.google.com/file/d/1vruxP9ZbdG2VYIpJCYp2FTLPs3s777Ej/

## कार्यालयातील कामकाजाच्या जागेतून मिळते सकारात्मक ऊर्जा...

दिनांक १५ जुन पासून मी ऑफिसला येणं परत सुरु केलं. माझं कामाचं टेबल, माझी बसण्याची जागा, ऑफिस मधील वातावरण हे सर्व खूप दिवसांनी पाहून खूप छान वाटलं. गेली दीड वर्ष घरून काम करत असताना कामाची स्वतंत्र जागा, काम करतानाची सुरक्षितता, पारदर्शकता तसेच काम करताना आवश्यक असलेली प्रायवसी या सर्वांचे महत्त्व जाणवले.

दिलेले काम कुठल्याही अडथळयाशिवाय लक्ष केंद्रित करून काम करण्यामागे ऑफिस मधील कामाच्या टेबलाचा खूप मोठा भाग असतो. ताई, घरून काम करत असताना मला माझ्या ऑफिस मधील जागेची खूप आठवण येत असे. ती माझ्यासाठी अशी जागा होती जिथे मी माझे इतर असलेल्या विवंचना एका बाजूला ठेवून काम करण्याची उर्जा देत असे. दिलेली कामगिरी अपेक्षेप्रमाणे उत्तम रित्या पार पाडण्यासाठी माझी ऑफिस मधील जागा फार मदत करत असे. ही अशी एक जागा आहे जिथे मला माझ्यातील उत्तमातील उत्तम गोष्टींचा शोध लागतो. हीच लहानशी ४x४ ची छोटीशी जागा आयुष्यातील इतर विचलित करणाऱ्या गोष्टींपासून लांब नेऊन काम करण्यासाठी शांतता आणि स्थिरता देण्यास किती महत्त्वाची आहे ह्याची मला मागील काही काळात जाणीव झाली. ऑफिस पुन्हा सुरु करण्यासाठी आणि लेंड अ हेंड मध्ये अशी एक जागा आम्हाला मिळवून देण्यासाठी खूप खूप धन्यवाद. (स्नेहल उतेकर, लाही टीम, पुणे ऑफिस)

# ‘कारीगर’ - कौशल्य प्रशिक्षण केंद्र: भाग दोन

**मागील** लेखात आपण ‘कारीगर’ प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यामागच्या उद्दिष्टांची आपण चर्चा केली. या लेखात आपण कारीगर प्रशिक्षण केंद्राच्या भूमिकेबद्दल महिती घेवूयात. आपण सगळे जाणतोच कि उद्योग जगतात एकाबाजूला अकुशल तरुणांची मोठी संख्या आहे तर दुसरीकडे कुशल मनुष्यबळाची प्रचंड गरज आहे. या तरूणाइला नोकरीसाठी विशिष्ट कौशल्यांचे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले तर त्यांना आसपासच्या जॉब मार्केटमध्ये रोजगाराच्या चांगल्या संधी मिळू शकतात आणि एक चांगले जीवन जगू शकतात. विविध कौशल्यांवर आधारित क्षमता बांधणीसाठी अत्याधुनिक प्रशिक्षण पद्धती गरजेची झालेली यातून आपल्याला दिसते. व्यक्ती अथवा समूहाकरिता आवश्यक ते तांत्रिक कौशल्य आणि सोबतीला व्यक्तिमत्त्व विकसनासाठीची रोजगार कौशल्य उपलब्ध केली गेली तर नक्कीच त्याचा उपयोग जीवनमान उंचवण्यासाठी होऊ शकतो. हि बाब लक्षात घेऊन प्रशिक्षणाचे महत्व आणि गरज ओळखून लेंड अ हँड इंडिया ने पुणे येथे ‘कारीगर’ या अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्राची उभारणी केली.

या बहुविध कौशल्य केंद्रात उमेदवार कौशल्य शिकू शकतील आणि त्याच कौशल्यांच्या जोरावर राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा(NSQF) व राष्ट्रीय कौशल्य विकास संस्था (NSDC –एनएसडीसी) अंतर्गत असलेल्या विविध कौशल्यांच्या अभ्यासक्रम पूर्तता प्रमाणपत्रासाठी पात्र ठरतील. लॅंड अ हँड इंडिया कारीगर प्रशिक्षण केंद्राचे अजून एक उद्दीष्ट आहे की प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT- Training od trainers) प्रोग्राम्सद्वारे अधिकाधिक रोजगारक्षम उमेदवारांना संबंधित कौशल्यासाठी अत्याधुनिक प्रशिक्षण आणि इंटर्नशिप संधी उपलब्ध करून देणे. उत्तम प्रशिक्षक आणि कौशल्यप्राप्त विद्यार्थी हे एकमेकांना परस्परपूरक ठरतील याकरिता ‘कारीगर’ केंद्रात कौशल्यांसोबत योग्य समुपदेशन देखील उपलब्ध आहे. आता शासकीय पातळीवर देखील उद्योग जगताला आवश्यक असणाऱ्या कौशल्यप्राप्त उमेदवारांना आरपीएल(RPL – recognition of prior learning) सारख्या उपक्रमामातून नवीन ओळख मिळते आहे. या उपक्रमातून उमेदवारांना त्यांच्या प्राप्त कौशल्याच्या पातळीप्रमाणे प्रमाणित करण्यात येते. जेणेकरुन खुल्या उद्योग जगतात त्यांना त्यांच्या प्राप्त कौशल्य आणि अनुभवाच्या आधारवर आपल भविष्य उभा करता येईल. तसेच उद्योग व्यवसायांना आपल्या गरजेप्रमाणे योग्य उमेदवार देखील मिळतील.

पुढील लेखात ‘कारीगर’ कौशल्य केंद्राबद्दल अधिक जाणून घेवूया. या संपूर्ण लेखमालेचा उद्देश हा आपल्या सर्वांपर्यंत ‘कारीगर’ कौशल्य केंद्राबद्दल तसेच त्याचे उद्दिष्ठ, भूमिका, तिथे उपलब्ध असलेल्या सुविधा, विविध कौशल्य अभ्यासक्रम शिकण्याच्या संधी, केंद्राची कौशल्य शिक्षणातील भूमिका, शासकीय प्रमाणपत्रप्राप्त कौशल्य अभ्यासक्रम इत्यादींबाबत आपल्यासाठी माहिती घेवून येणे हा आहे.



# आगामी वार्ता

- कोविडमुळे यावर्षीही शाळा ऑनलाईन घेण्यात येणार आहेत. इतर सर्व विषयांप्रमाणेच साद + साठीही सत्रे ऑनलाईन घेतली जातील. **साद + सत्रे जुलै महिन्यापासून पुणे महानगरपालिकेच्या सहा आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चार शाळांमध्ये सुरू होतील.**
- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये **Internship@Home उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील कौशल्य शिक्षण घेणारे १०० विद्यार्थी कोविड आजाराबाबत जन जागृती करणार आहेत.** यामध्ये विविध साधनांचा वापर ते करणार असून हा उपक्रम ऑनलाईन होणार आहे.
- **१५ जुलै रोजी सर्वत्र 'जागतिक युवा कौशल्य दिवस' साजरा केला जातो.** मागील वर्षी प्रमाणे याही वर्षी आपल्या शाळेत कोरोना परिस्थितीचा आढावा घेऊन तसेच सर्व सुरक्षितते संबंधी काळजी घेऊन तो साजरा करावा. साजरा केल्यानंतर कार्यक्रमाचा अहवाल आणि फोटो email अथवा whats app च्या माध्यमातून लाही कडे पाठवावे.
- कोरोना परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत गंभीर परिणाम भोगावे लागलेल्या **पुणे येथील गरजवंत कुटुंबियांना रेशन कीट चे वाटप करण्यात येणार आहे.** हि या उपक्रमाची दुसरी फेरी असून पहिली फेरी पुर्ण झाली आहे.

# लेंड अ हँड इंडिया अपडेट्स

- **करोना १९ मदतकार्य:**

कोरोना परिस्थितीमुळे गंभीर परिणाम भोगावे लागलेल्या पुणे आणि मुंबई येथील असंख्य गरजवंत कुटुंबियांना रेशन कीट चे वाटप करण्यात आले.

याशिवाय बीड जिल्ह्यातील कोरोनाचा फटका बसलेल्या पंचवीस गावातील सुमारे तीन हजार कुटुंबियांना स्थानिक सामजिक संस्थांच्या सहकाऱ्याने रेशन कीट व स्वच्छता कीट चे वाटप करण्यात आल.

- **ऑन-द- जॉब शिक्षण / प्रशिक्षण:**

अशोका संस्थेतर्फे आयोजित 'Scaling through Partner-ships' या विषयावर आधारित तीन महिन्यांचा माहितीपुर्ण कोर्स लाहीचे सिनीअर सहकारी निलेश पुराडकर आणि मयुर खैरे यांनी पुर्ण केला.

- **मुंबई आणि पुणे येथील विद्यार्थ्यांकरिता करीअर मार्गदर्शन कार्यशाळा:**

जे.पी. मोर्गन आणि क्रेडीट स्विस यांच्या CSR प्रकल्पांतर्गत मागील महिन्यात संपन्न झाल्या.

- **लाही व सी.बी.एस.ई. बोर्ड:**

देशभरातील सर्व सीबीएसई शाळांमध्ये आता २०२१-२२ पासून मल्टी स्कील उपक्रम उपलब्ध आहे. अत्यंत सोप्या अर्ज प्रक्रियेमधून कोणतीही सीबीएसई शाळा आता कलती स्कील विषय आता सुरु करू शकते. सध्या हा विषय शिकवणाऱ्या प्रशिक्षकांसाठी मल्टी स्कील विषयाचे प्रशिक्षण सुरु आहे. सध्याच्या कोविड परिस्थितीत, हे प्रशिक्षण ऑनलाइन होत आहे.

- **तिबेटीयन शाळांमध्ये मल्टी स्कील:**

कर्नाटक राज्यामधील सीबीएसई च्या चार तिबेटीयन शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष 2021-22 पासून मल्टी स्किल फाऊंडेशन कोर्स सुरु होत आहे. यासाठी निदेशाकांचे प्रशिक्षण मे 2021 च्या महिन्यात घेण्यात आले.

# प्रोजेक्ट कॅटॅलिस्ट : भाग एक - समग्र शिक्षा, महाराष्ट्र राज्य उपक्रम

**'कौशल्य शिक्षण' योजनांकरिता शासकीय पातळीवर धोरणात्मक कार्य करणारे व्यासपीठ .**

## समग्र शिक्षा: महाराष्ट्र राज्य उपक्रम

तरुणांना शालेय जीवनातच कौशल्य शिक्षणाची ओळख करून दिल्यास स्वावलंबी बनण्यास मदत होते आणि बेरोजगारीवर मात करता येऊ शकते या धोरणात्मक विचाराने केंद्र शासनाने सन २०१३-१४ पासून निवडक सरकारी शाळांमध्ये राष्ट्रीय स्तरावर व्यावसायिक शिक्षण योजनेची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. राज्यामध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान वर्तमानातील समग्र शिक्षाकडे या योजनेचे संपूर्ण जबाबदारी आहे. ऑटोमोबाईल, रिटेल, मल्टी स्किल फौंडेशन कोर्स, हेल्थकेअर, अग्रीकल्चर, इलेक्ट्रोनिक्स, फूड प्रोसेसिंग यासारखे रोजगार आधारित १०० मार्कांचा विषय विध्यार्थ्यांना राष्ट्रीय योजना पात्रता आराखडानुसार (NSQF) शिकविले जातात. विध्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान मिळावे यासाठी ७० गुण प्रात्यक्षिक तर ३० गुण लेखी परीक्षा अशी अभ्यासक्रमाची विभागणी केलेली आहे. यासाठी लागणारा अभ्याक्रम व पाठ्यपुस्तक निर्मिती पंडित सुंदरलाल शर्मा केंद्रीय व्यावसायिक शिक्षण संस्था, भोपाळ, लेखी चाचणी राज्य शिक्षण महामंडळ, तर प्रात्यक्षिक चाचणी सेक्टर स्कील कौन्सिलद्वारे केली जाते. योजनेची शाळांमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष प्राविण्य व अनुभव असलेल्या बाह्य संस्थेची राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आलेली आहे. तसेच या योजनेत लेंड अ हॅण्ड इंडिया शासनास राज्य व जिल्हा स्तरावर नियोजन, व्यवस्थापन, सहनियंत्रण, गुणवत्ता वाढ व व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी सहकार्य करीत आहे. महाराष्ट्राप्रमाणे लेंड अ हॅण्ड इंडिया इतर २४ राज्यांना तांत्रिक व व्यवस्थापन सहकार्य करीत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये केंद्र शासनाने महाराष्ट्रासाठी ३५० शाळांमध्ये कौशल्य शिक्षण उपक्रम राबवण्यासाठी मंजुरी दिली होती. विध्यार्थी, पालक शिक्षक यांच्या मागणीमुळे व शाळास्तरावर व्यावसायिक शिक्षणच्या सकारात्मक बदलामुळे पुढे महाराष्ट्रात दर वर्षी शाळांची संख्या वाढवण्यात आली. आज महाराष्ट्रात एकूण ६४६ शाळांमध्ये कौशल्य शिक्षण राबविले जाते. प्रत्येक शाळांमध्ये दोन कौशल्ये शिकवण्यात येतात त्यामुळे एका शाळेत दोन असे संबंधित विषयात पदवीधर व अनुभवी ११८५ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक सुसज्य कार्यशाळा सर्व शाळांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत, व कच्चा माल आवश्यकतेनुसार पुरविला जातो. प्रात्यक्षिक, क्षेत्र भेट, अथिती व्याखान, इंटर्नशिप, १२वी नंतर विध्यार्थ्यांना नोकरी व्यवसाय करण्यासाठी तांत्रिक मदत उपलब्ध करून देणे व दरवर्षी प्रशिक्षकांना सबंधित क्षेत्रातील तज्ञाद्वारे सेवाकालीन प्रशिक्षण देणे हे या योजनेचे खास वैशिष्ट्य आहे.

सन २०१८ ते २०२१ पर्यंत ११वी व १२वीच्या साधारण दहा हजार विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप पूर्ण केली आहे. अनेक विध्यार्थ्यांनी पदवीसाठी तांत्रिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आहे, तसेच काही विध्यार्थी स्वत:चा व्यवसाय किंवा नोकरी करीत आहे. आजतागायत महाराष्ट्रातील सुमारे दिड ते दोन लाख विद्यार्थ्यांनी कौशल्य शिक्षणाचा लाभ घेतला आहे. या योजनेचे विध्यार्थी, पालक, व शाळास्तरावर झालेले सकारात्मक परिणाम लक्षात घेऊन योजनेला अधिक सक्षम बनविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

Lend A Hand India

**लेंड अ हॅंड इंडिया**

9 , जीवन विहार हौसिंग सोसायटी ,
प्राईड पॅनोरमा जवळ, ऑफ सेनापती बापट मार्ग,
४११०१६ , फोन : (०२०) २५६३ ००९२.
Lahi@lend-a-hand-india.org , www.lend-a-hand-india.org